MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –११ | शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -11 | SATURDAY DT.28 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## कृषी विभागामार्फत फुले उत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचे ४४८ पुरस्काराचे वितरण

परळी ।प्रतिनिधी

कृषी विभागामार्फत कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांचा रविवार (२९) रोजी सायं. ५ वा. मुंबई येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे कृषीपुरस्कार प्रदान करुन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. कोविड तसेच विविध कारणांमुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षातील एकूण ४४८ पुरस्कारांचे वितरण राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.या कार्यक्रमात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार (१), वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार (८), जिजामाता कृषी भूषण पुरस्कार(८), कृषी भूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार (८), उद्यान पंडित पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (४०), पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार(१०), युवा शेतकरी पुरस्कार(८), अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजनेतील पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्रात २६ नोव्हेंबरपूर्वी विधानसभा निवडणुकीचा बार

## गुन्हेगार उमेदवार, पक्षांना पार्श्वभूमीची द्यावी लागेल जाहिरात

मुंबई / प्रतिनिधी

महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचा फड रंगण्याची चिन्हे आहेत. गत २ दिवसांपासून राज्याच्या दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकाने शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी विविध राजकीय पक्षांसह निवडणुकीशी संबंधित सर्वच भागिदारांशी झालेल्या चर्चेचा संक्षिप्त तपशील सांगितला. तसेच निवडणुकीची प्रक्रिया विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येण्यापूर्वीच म्हणजे २६ नोव्हेंबरपूर्वी पार पाडण्याचे संकेतही दिले. त्यामुळे पुढील महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक गुरुवारी सायंकाळी राज्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात या पथकाने शुक्रवारी विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली. त्यानंतर आज विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक तथा इतर भागिदारांशी चर्चा करून त्यांची निवडणुकीसंबंधीची मते जाणून घेतली. त्यानंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आपल्या दौऱ्याचा तपशील सादर केला.

**सणवार लक्षात घेऊन मतदानाची तारीख ठरवणार**

राजीव कुमार म्हणाले, आम्ही दोन दिवस विविध राजकीय पक्षासह सर्वच भागिदारांशी चर्चा केली. त्यात सर्वच पक्षांनी दीपावली, देव दिवाळी व छटपूजेसारखे सणवार लक्षात घेऊन निवडणुकीची तारीख निश्चित करण्याची विनंती केली.

राजकीय पक्षांनी निवडणुकीची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवण्याचीही सूचना केली. त्यांची ही सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण, निवडणुकीची तारीख आठवड्याच्या शेवटी ठेवल्यामुळे शहरी भागातील मतदार सुट्ट्यांचा मेळ साधून शहराबाहेर जातात. त्याचा फटका निवडणुकीच्या टक्केवारीला बसतो. त्यामुळे मतदानाची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवली जावी अशी त्यांची विनंती होती, असे राजीव कुमार म्हणाले.

**रांगेत ताटकळत उभे राहण्यावर उपाय शोधणार**

लोकसभा निवडणुकीत मुंबईसह अनेक शहरांतील मतदान केंद्रांवर मतदारांची तासंतास ताटकळत उभे राहण्यासारखी गैरसोय झाली होती. त्यामुळे आगामी निवडणुकीत असे प्रकार टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची सूचनाही काही पक्षांनी केली. आयोग यासंबंधी खुर्च्या उपलब्ध करून देण्यावर विचार करेल. काही पक्षांनी निवडणुकीच्या काळात अधिकाऱ्यांच्या बदल्या तटस्थपणे करण्यावर जोर दिला. काहींनी पैशांच्या गैरवापराकडेही लक्ष वेधले. विशेषतः काही पक्षांनी वृद्ध व दिव्यांग मतदारांना दूरच्या मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यात येणाऱ्या अडचणींवर योग्य ती उपाययोजना करण्याची विनंती केली.

मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणारा पोलिंग एजंट त्याच बूथवरील असावा असा आग्रहीही काही पक्षांनी धरला. निवडणूक आयोग यावरही योग्य तो निर्णय घेईल. निवडणुकीच्या काळात फेक न्यूजची मोठी समस्या असते. त्यावरही काही पक्षांनी चिंता व्यक्त केली, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

**विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपणार**



राजीव कुमार यांनी यावेळी महाराष्ट्रातील मतदारांची संख्या व इतर आकडेवारी सांगितली. ते म्हणाले, महाराष्ट्रात २८८ मतदारसंघ आहेत. यापैकी २५ मतदारसंघ अनुसूचित जमाती (एसटी), तर २९ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी (एससी) राखीव आहेत. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया त्यापूर्वी पार पाडली जाईल.

**राज्यात १९.४८ लाख फर्स्ट टाईम मतदार**

राज्यात एकूण ९.५९ कोटी मतदार आहेत. त्यात ४.५९ कोटी पुरुष, तर ४.६४ कोटी महिला मतदार आहेत. थर्ड जेंडर म्हणजेच तृतीयपंथी मतदारांची संख्या ५९९७ असून दिव्यांग मतदारही ६.३२ लाख एवढे आहेत. महाराष्ट्रात थर्डजेंडर व पीडब्ल्यूडी मतदारांची संख्याही लक्षणीय आहे. हे सदृढ सामाज व कुटुंब व्यवस्थेचे लक्षण आहे. महाराष्ट्रात पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची म्हणजे १८ ते १९ वर्ष वयोगटातील संख्या १९.४८ लाख आहे. या निवडणुकीत आमचे या तरुण मतदारांवर खास लक्ष असेल. कारण हेच तरुण मतदार भविष्यात लोकशाहीला पुढे नेण्याचा प्रयत्न करणार आहेत.

**गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या उमेदवारांना करावी लागणार घोषणा**

गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या उमेदवारांना आपल्यावरील दाखल गुन्ह्यांची स्थानिक वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांत तीनदा जाहिरात द्यावी लागणार आहे. त्या ज़ाहिरातीत त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल आहेत? ते सांगावे लागणार आहे.



बऱ्याच दिवसापासून कडा देवळाली हा रस्त्याचा प्रश्न प्रलंबित होता परंतु मध्यंतरी पंधरा कोटी रुपयांचं काम मेहेर कंट्रक्शन यांच्यामार्फत करण्यात आले रस्ता होऊन चार ते पाच महिने होत नाही तोपर्यंत रस्त्यावर खड्डे पडायला सुरुवात झाली आहे त्यामुळे या कामाची बिल अदा करू नये केले असेल तर त्या कामाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी जनहित लोकशाही पार्टी बीड जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यांनी केली आहे

## सात हजाराची लाच घेताना तलाठी लाचलुचपत च्या जाळ्यात

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : दारुबंदी विभाग व गेवराई पोलिस ठाण्याकडून दाखल गुन्ह्यात उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाने नोटीस बजावली होती. त्या अनुषंगाने बंधपत्र लिहून घेण्यासाठी व सदर प्रकरण बंद करण्यासाठी ७ हजाराची लाच घेणार्या तलाठ्यास छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत विभागाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई शुक्रवारी (दि.२७) बीड येथील उपविभागीय कार्यालयात केली. निलेश मेश्राम असे अटक केलेल्या तलाठ्याचे नाव आहे.

तक्रारदार यांचे गेवराई हद्दीत राक्षसभुवन रोडवर जय हिंद नावाचे हॉटेल असून सदर हॉटेलवर दारूबंदी विभागाकडून व गेवराई पोलीस ठाण्याकडून दोन गुन्हे दाखल होते. त्या गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी त्यांना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय बीड येथून प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी नोटीस बजावण्यात आली होती. त्या नोटीसच्या अनुषंगाने बंधपत्र लिहून घेण्यासाठी व सदर प्रकरण बंद करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे मेश्राम याने दोन हजार रुपये व उप विभागीय



दंडाधिकारी मॅडम यांच्यासाठी पाच हजार रुपये अशी एकूण सात हजाराच्या लाचेची मागणी केली होती. आज (शुक्रवारी) कार्यालर्यात पंचासमक्ष लाच स्विकारताना त्याला लाचलुचपत रंगेहाथ अटक केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक हरिदास डोळे यांच्यासह त्यांच्या पथकाने केली.

# आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद वाढली.. शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे

## शिवसेना संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब शिवसेना सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराजजी सानप शिवसेना बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते ....

दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँण्ड यशोदा या ठिकाणी शिवसेना आष्टी व माजलगाव मतदार संघाची आढावा बैठक शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर जी सातपुते सर यांनी आयोजित केली होती. या शिवसेनेच्या आढावा बैठकीचे रूपांतर शिवसेनेच्या मेळाव्यामध्ये झाले या मेळाव्याला शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा ताई अंधारे यांनी संबोधित केले यावेळी बोलताना सुषमा ताई अंधारे असे म्हणाल्या की आष्टी मतदारसंघांमध्ये गेल्या सात आठ महिन्यापूर्वी शिवसेनेची ताकद नगण्य होती परंतु शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्याकडे धुरा सोपवल्यानंतर त्यांच्या कुशल संघटनाने सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन आष्टी मतदार संघामध्ये शिवसेनेची ताकद वाढवली त्याबद्दल सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांचे अभिनंदन केले व येणाऱ्या काळात याच प्रमाणे माजलगाव मतदार संघामध्ये शिवसेनेचे उत्तम संघटन जिल्हाप्रमुख सातपुते यांच्या माध्यमातून नक्कीच होईल यात तील मात्र शंका नाही.पक्षाने आष्टी व माजलगाव दोन्ही विधानसभा जागा सोडून घ्याव्यात अशी पदाधिकाऱ्यांनी इच्छा व्यक्त केली कारण त्या संबंधित विधानसभा क्षेत्रात जनतेचा कौल लागल्याने शिवसेनेचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येण्याची शक्यता आहे. यावेळी बोलताना सुषमाताई अंधारे यांनी असे सांगितले या दोन्ही मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आष्टी आणि माजलगाव विधानसभा मतदारसंघावरती शिवसेनेला जागा सोडावी याबाबत दावा केलेला आहे तरी पक्षसृष्टीशी बोलून यापैकी एक तरी जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडून घेण्याचा शब्द दिला..



यावेळी शिवसेनेचे संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांचेही समायोजचित भाषण झाले यावेळी त्यांनी असे सांगितले अडचणीच्या काळामध्ये ज्या शिवसैनिक पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढवण्याचे काम सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अविरतपणे केले त्यामुळे आष्टी मतदार संघ आणि माजलगाव मतदारसंघांमध्ये आज शिवसेनेला बळकटी निर्माण झाली आहे.त्यासोबत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक तरुणांनी शिवसेनेत प्रवेश केला त्यांचेही अभिनंदन केले..

यावेळी बीड जिल्ह्याचे सह संपर्कप्रमुख डॉक्टर लक्षराज सानप यांनी आपल्या भाषणात आगामी काळात रिक्त पदांवरती पदाधिकाऱ्यांची नियुक्ती आणि अधिकाधिक शाखा काढून आगामी विधानसभा काळात पक्षाला बळकटी देऊन दोन्ही मतदारसंघात विजयश्री नक्की मिळेल असे मत व्यक्त केले तसेच एक कुशल संघटक आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारे बीड जिल्ह्याचे यशस्वी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या कुशल संघटना विषयी आणि नियोजनाबद्दल त्यांचे मनःपूर्वक कौतुक करून पक्षाला बळकटी दिल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन केले..

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना असे म्हटले की आष्टी आणि माजलगाव मतदार संघामध्ये माझ्याकडे शिवसेनेची जिल्हाप्रमुख पदाची सूत्रे येताच या दोन्ही मतदार संघामध्ये शिवसेनेचे संघटन मजबूत करण्याचं काम फक्त सात महिन्यांमध्ये केल्यामुळे पक्षाने माझ्या कार्याची दखल घेतली व या भागामध्ये निष्ठावंत शिवसैनिक पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या जीवावरती अवघ्या सात महिन्यांमध्ये मजबूत संघटन निर्माण करू शकलो व निष्ठावंत शिवसैनिकांची फळी निर्माण करू शकलो त्याबद्दल मला मनस्वी आनंद होत आहे. येणाऱ्या काळामध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातलेले आहेत या निवडणुकीमध्ये आष्टी आणि माजलगाव मतदार संघ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडे पक्षाने सोडून घेतल्यास या दोन्ही मतदारसंघावरती शिवसेनेचा भगवा फडकविण्याचे काम शिवसैनिकांच्या जोरावर करू असे मत व्यक्त केले.

यावेळी बैठकीसाठी बीड जिल्ह्यातून आष्टी आणि माजलगाव मतदार संघातील सहाही तालुक्यामधून शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिक बंधू आणि महिला पदाधिकारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी आभार मानले या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर यांनी केले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळुंके, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,शहर प्रमुख शेख निजाम भाई,विधानसभा प्रमुख नवनाथ अटूळे,विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,वडवणी तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड सह शिवसेना, युवासेना,महिला आघाडी चे सर्व आजी–माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!

# साक्षाळपिंप्री विद्यालयात सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न

नवगण राजुरी ।प्रतिनिधी

लोकनेत्या स्व.माजी खा.केशरकाकू च्या स्मृतीदिनानिमित्त साक्षाळप्रिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या. स्व.माजी खा.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १८ व्या स्मृतीदिनानिमित्त साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळेचे मुख्याध्यापक पवळ पी.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन शुक्रवार दि.२७ रोजी सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना सामान्यज्ञानाचे प्रश्न देवून स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या सुरूवातीस स्व.काकूंच्या पावणस्मृतीस अभिवादन करण्यात आले. सामान्यज्ञान स्पर्धेत शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे नियोजन गवते ए.जी. यांनी केले. त्यांना सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.



# बापूसाहेब डोके यांचा आष्टी मतदार संघात ठिकठिकाणी गाठीभेटी दौरा,नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

आष्टी ।प्रतिनिधी

बापूसाहेब डोके यांनी आष्टी मतदार संघातील गावागावांतील नागरिकांच्या गाठीभेटी घेत संवाद साधला ठिकठिकाणी तरुणांनी व ग्रामस्थांनी बापूसाहेब डोके यांचे उत्साहात स्वागत केले.आष्टी तालुक्यातील देवळाली घाटा पिंपरी धामणगाव कडा टाकळी येथे त्यांनी भेट दिली असता तेथील असंख्य ग्रामस्थांनी बापूसाहेब डोके यांचे जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत केले. यावेळी शेकडो ग्रामस्थांनी आगामी विधानसभा निवडणुकीत बापूसाहेब डोके यांनाच आमदार करणार असे सांगून आपला पाठिंबा जाहीर केला.

देवळाली येथे चैतन्य स्वामींचे दर्शन घेतल्यानंतर बापूसाहेब डोके म्हणाले की आजही सामान्य माणूस प्रगती पासून व विकासापासून कोसो दूर राहिला आहे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवणार आहे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार साहेब गट यांच्याकडे मी विधानसभेच्या तिकिटाची मागणी ही केली आहे सर्वांच्या आशीर्वाद सहकार्य लाभले तर आता गुलाल आपलाच व आपण तो सर्वांच्या सहकार्याने व चैतन्य स्वामींच्या आशीर्वादाने मोठ्या उत्साहात उधळू बापूसाहेब डोके यांनी यावेळी देवळाली व परिसरातील एमबीबीएस एमपीएससी पास झालेले व शिक्षण घेऊ असलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी देवळाली व परिसरातील असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते






**गेवराई ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील पाडळशिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या स्मृतिदिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा शुक्रवारी संपन्न झाल्या.आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजीत केलेल्या वेगवेगळ्या स्पर्धापैकी सामान्यज्ञान स्पर्धा शुक्रवार दि.२७ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा.थिटे ए.एस. यांच्या हस्ते करून यशस्वी स्पर्धकांना प्राचार्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सामान्य ज्ञान स्पर्धा इयत्ता ५वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी या दोन गटामध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी सर्वश्री धिवार बी.एस.,चतुर एस.एस., येडे ए.आर. यांचे सहकार्य लाभले. यावेळी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, राजेंद्र सोनवणे, घरत आर.के., कळासे ए.आर. आदि उपस्थित होते.**

# महिला सामाजिक कार्यकर्त्या कीर्ती शिंदे यांची आजाद समाज पार्टी कांशीराम बीड शहराध्यक्षपदी निवड-आरिष कुमार चव्हाण

बीड ।प्रतिनिधी

पूरग्रस्त कॉलनी बीड येथील महिला सामाजिक कार्यकर्त्या कु. कीर्ती शिंदे यांची आजाद समाज पार्टी कांशीराम च्या बीड शहराध्यक्षपदी निवड महाराष्ट्र अध्यक्ष महिला आघाडीच्या नेहा ताई शिंदे यांच्या सांगण्यावरून खासदार ड. भाई चंद्रशेखर आजाद यांचे हात बळकट करण्यासाठी व महिलांचे प्रश्न शासन प्रशासन दरबारी मांडण्यासाठी बीड जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांच्या हस्ते बीड शहराध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले यावेळी आझाद समाज पक्ष जिल्हाध्यक्ष आशिष चव्हाण उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की देशामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय अत्याचार होत असून त्याला वाचा फोडण्यासाठी महिलांनी स्वबळावर लढण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार भाई चंद्रशेखर आझाद रावण हे महिलांच्या संरक्षणासाठी व भारताच्या संविधानासाठी अहोरात्र झटत असून त्यांचे हात बळकट करणे तुमच्या आमच्या सारख्या सर्वसामान्य माणसाची प्रश्न संसदेमध्ये मांडण्यासाठी प्रत्येकाने एकजुटीने आझाद समाज पक्षाच्या पाठी खंबीरपणे उभे राहणे काळाची गरज आहे. यावेळी जिल्हा बीड जिल्हा कार्यकारणीचे सय्यद इनाम इनामदार,ड.सदानंद वाघमारे उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना कीर्ती शिंदे म्हणाले की भाई चंद्रशेखर आझाद हे दिल्लीमध्ये राहून भारतीय संविधानाची रक्षा करत असून माता भगिनींना संरक्षण देण्यासाठी व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी संसदेमध्ये आपले कार्य बजावत असून त्यांना पुढील काळात अधिकारी काम करण्याची संधी मिळावी यासाठी आपण स्वतःहून बीड शहरातील प्रत्येक वार्डामध्ये भाई चंद्रशेखर आझाद यांचे विचार तळागाळापर्यंत पर्यंत पोहोचवण्याचे काम करणार आहे सर्वसामान्य नागरिकांना महिलांना भारतीय संविधानाबद्दल जागृती करून महिलांना आत्मसंरक्षण करण्यासाठी व गोरगरीब वंचित दुर्लक्षित लोकांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे काम या माध्यमातून प्रामाणिकपणे करणार असल्याचेही यावेळी त्या म्हणाल्या यावेळी परिसरातील मोहन वारभवण,प्रेम कोरडे,अचान वाघमारे,प्रेरणा गायकवाड,ललिता वाघमारे,पायल शिंदे,राणी बाचुटे ( शाखा अध्यक्ष पूरग्रस्त कॉलनी),आम्रपाली कोरडे,आकांशा वरभवण,सायली चक्रे,सुंदर नाना,छाया शिंदे,अंजली शिंदे,संतोष वाडमारे,कोमल वाघमारे मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते



# प्रा.ईश्वर मुंडे यांच्या गाव भेट दौऱ्याची शंभरी

## तुतारी पोहचवली घरो घरी

माजलगाव ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कांही दिवसावर येऊन ठेपली आहे.माजलगाव मतदार संघात पावसाने वातावरण गारे गार केलेले आसले तरी महा युतीचे घड्याळ कोणाला मिळेल? महा विकास आघाडीची तुतारी कोणाला मिळेल ? खा.शरद पवार यांना कोण कोण भेटले या चर्चेने वातावरण गरम झालेले आहे.

तुतारी कडे कोण येणार अन तुतारी कोणाला भेटणार या चर्चेत न आडकता माजलगाव विधानसभा मतदार संघात आपल्यालाच उमेदवारी भेटेल व आपणच तुतारी वाजवू या अपेक्षेने प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे मात्र पायाला भिंगरी बांधून माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आसल्याचे चित्र दिसत आहे.

बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन सक्रीय समाजकारण व राजकारण करणारे प्रा.ईश्वर मुंडे बीड लोकसभा निवडणूकीच्या वेळी उमेदवारीच्या चर्तेत आलेले होते.

माजलगाव मतदार संघाचे शेवटचे टोक व आपले स्वत:चे गाव गांजपूर येथून आपल्या आई-वडीलांच्या उपस्थितीत सुरू केलेल्या गाव भेट दौरा कार्यक्रमाने मतदार संघातील धारूर व वडवणी तालुक्यांतील शंभर गावे पूर्ण केलेली आहेत.

आपल्या गाव भेट दौऱ्याचा फार गाजावाजा न करता, किती मानसे उपस्थीत राहतील याची काळजी न करता, शक्य होतील तेवढेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सोबत घेऊन सकाळी आठ ते संध्याकाळी आठ या वेळेचे नियोजन करून गावा गावात जाणे,मंदीरात दर्शन घेणे,घरोघरी भेटणे, दुकान,टपरी,हॉटेल,,बाजारात भाजी पाला विकणारे शेतकरी, खेळणी,भांडे व खाऊचे पाल,रस्त्याने ये -जा करणारी मानसे यांना आदरपूर्वक नमस्कार करणे,विधानसभा निवडणूक,खा.शरदचंद्र पवार,आ.जयंत पाटील,पक्षाची भुमिका व तुतारी वाजवणारा माणूस हे पक्षाचे निवडणूक चिन्ह सांगत आपल्या परिचय पत्राची छापील पॉम्पेट हातात देवून पुढे चालणे असा प्रवास चालू आहे.

माजलगाव मतदार संघात महा विकास आघाडीची उमेदवारी कोणाला भेटेल हे लवकरच जाहीर होईल परंतू खा.शरदचंद्र पवार हे सोशल इंजिनिअरींग चा प्रयोग करतील व उमेदवारी आपल्यालाच मिळेल,आपणच लढू व जिंकू या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आहेत.उच्च शिक्षित,प्रशासकीय सेवेचा अनुभव,चारित्र्य संपन्न व सतत हास्य वदनी नवीन चेहऱ्यास जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.






# बाजीराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'एकनाथ आरोग्य रथ' बीडकरांच्या सेवेत रुजु !

बीड ।प्रतिनिधी

आरोग्य क्षेत्रात सतत कार्यरत असलेले आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी आपल्या नव्या संकल्पनेतून एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. नुकतेच मुख्यमंत्री मा. एकनाथ जी शिंदे यांच्या हस्ते 'एकनाथ आरोग्य रथ' या फिरत्या दवाखान्याचे उद्घाटन करण्यात आले. हा आरोग्य रथ बीड मधील जनतेच्या सेवेत तत्पर झालेला आहे.वांगी गावापासून या उपक्रमाची सुरुवात झालेली आहे. या फिरत्या दवाखान्यात १०० हून अधिक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध असून, लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी हे आरोग्य सेवा केंद्र एक वरदान ठरले आहे. विशेषतः, वयोवृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी, ज्यांना हॉस्पिटलमध्ये जाणे कठीण होते, त्यांच्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला आहे. त्यांच्या दारापर्यंत येणारी आरोग्यसेवा हे या रथाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.बाजीराव चव्हाण यांनी यापूर्वीही विविध माध्यमांतून लोकांच्या आरोग्य समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. या नव्या उपक्रमाच्या माध्यमातून ते ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य सेवांसाठी हा उपक्रम एक आदर्श उदाहरण ठरला असून, येत्या काळात याचा विस्तार अधिकाधिक गावांमध्ये करण्यात येईल, अशी अपेक्षा आहे.




**आनंदाचा शिधा वाटप करताना स्वस्त धान्य दुकानदार घाटा पिंपरी बबन तळेकर गावचे सरपंच विनायक भाऊ मुळीक पत्रकार सुरेश कांबळे लक्ष्मण तळेकर राजू झांजे छायाचित्र सुरेश कांबळे घाटा पिंपरी**

## पोलीस उपनिरीक्षक शांताराम रोकडे यांचा सोमवारी अंभोरा येथे सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन



आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शांताराम रोकडे यांना नुकताच पोलीस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली ते १९९१ साली बीड येथे भरती झाले होते त्यानंतर अंभोरा येथे त्यांनी सर्व जाती धर्माच्या धर्मातील लोकांना न्याय देण्याचे काम केले आता त्यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली त्यांचा सेवा निवृत्ती समारंभ सोहळा सोमवारी अंभोरा पोलीस स्टेशन येथे पार पडणार आहे आतापर्यंत त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत पोलीस वर्दीतील माणूस म्हणून चांगले काम केले आहे

# बीड रेल्वे स्टेशनला बाबासाहेबांच्या नावांचा बोर्ड पुर्वरत बसवा अन्यथा आत्मदाह करुत -धम्मानंद वाघमारे

बीड ।प्रतिनिधी

शहरात नव्याने होत असलेले रेल्वे स्टेशनला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन असे नाव भीम अनुयायी यांनी दिले होते परंतु बीड ग्रामीण पोलीस प्रशासनाने भीम अनुयायी यांना कसल्याही प्रकारची समज न देता डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीड रेल्वे स्टेशन स्थानकाचे नामपलक रात्रीच्या काळोख्याचा फायदा घेत बीड ग्रामीण पोलीस प्रशासनाने फाडले आहे तसेच निळ्या ध्वजाचा खाली फेकून अपमान केला आहे. वरील घटना पोलीस प्रशासनाने घडवून आणल्यामुळे बीड जिल्ह्यातील तमाम भीम अनुयायी तीव्र संतापातेची भावना व्यक्त करत आहेत बीड ग्रामीण पोलीस प्रशासनाने सदरील घटना केल्यामुळे समाजात तेढ निर्माण होऊन दंगल घडवण्याचा प्रकार बीड ग्रामीण पोलीस अधिकारी यांनी केला आहे तरी संबंधित बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे तसेच पोलीस प्रशासनाने त्यांच्या खजिन्यातून २४ तासाच्या आत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन बीड असे नाम फलक पूर्वरत लावावेत



अन्यथा २४ तासानंतर भीम दल संघटनेचे प्रमुख धम्मानंद वाघमारे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदाह आंदोलन करण्याची भूमिका घेणार आहेत.असे त्यांनी निवेदन पत्रकाद्वारे कळवले आहे.

# गेवराईतून मशाल चिन्हावर बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे उमेदवार

सुषमा अंधारेंनी केली घोषणा

गेवराई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातला शिवसेनेचा नंबर एकचा प्रबळ असलेला विधानसभा मतदारसंघ म्हणजे गेवराई आणि याच गेवराईतून मशाल चिन्हावर बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे उमेदवार असतील अशी थेट घोषणा शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे यांनी हजारो महिला - पुरुषांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी गेवराई स्त्री शक्ती संवाद दौरा आणि शिवसैनिकांचा शक्ती मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात मुख्य मार्गदर्शक म्हणून सुषमाताई अंधारे बोलत होत्या. कार्यक्रमास शिवसेना उपनेते अस्मिताताई गायकवाड, सह संपर्कप्रमुख माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, सहसंपर्कप्रमुख डॉ लक्ष्मणराव सानप, शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, सौ गिरीका भाभी पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव विद्याताई गाडेकर, संपर्क संघटिका महिला आघाडी संपदाताई गडकरी, शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, जिल्हा संघटक नितीन धांडे, गेवराई तालुकाप्रमुख अजय दाभाडे, बीड तालुका प्रमुख गोरख सिंगम, बीड विधानसभा प्रमुख मीराताई नवले, ॲड दैवशाला शिंदे, युवानेते रोहित पंडित, माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, युवा नेते यशराज पंडित आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्याला विराट संख्येने उपस्थित असलेल्या महिला, पुरुष शिवसैनिकांसमोर बोलताना शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे म्हणाल्या की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सामान्य लोकांसाठी काम करणाऱ्या बदामराव पंडित यांची बीड जिल्ह्यातील गेवराईतून शिवसेनेची पहिली उमेदवारी जाहीर केली असून, आता चर्चा करत बसण्यापेक्षा आबांना मोठ्या मताधिक्याने आमदार करण्यासाठी तुम्ही सगळ्यांनी एक जीवाने प्रयत्न करावेत. पुढची संधी पक्षप्रमुख उद्धव साहेब त्यांना देतील असे सांगून, सध्याचे सरकार गद्दारी करून आलेले आहे. हे जनतेच्या हिताचे आणि सुरक्षा देणारे सरकार नाही. गृहमंत्री सपशेल फेल ठरले आहेत. महिला व मुली सुरक्षित नाहीत. बेरोजगारांना नोकरी नाही. महागाई वाढली आहे. परंतु हे प्रश्न सोडविण्याऐवजी सत्ताधार्यांना जेव्हा लोकसभा निवडणुकीच्या बहिणीने जमिनीवर आपटले तेव्हा त्यांना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडक्या बहिणीची आठवण आली. बहिणीला दीड हजार रुपये देऊन साहेब



जाहिरातबाजी करत डांगोरा पेटणारा भाऊ पहिल्यांदा पाहायला मिळतोय. आठरा पगड जातीला सोबत घेऊन चालणारा हा महाराष्ट्र आहे. परंतु दोन जाती आणि धर्मामध्ये वाद निर्माण करण्याचे प्रयत्न सत्ताधारी करत आहेत. त्याला राज्यातली जनता बळी पडणार नाही. या विधानसभा निवडणुकीत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार निवडून येतील आणि राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येईल असा विश्वासही सुषमाताई अंधारे यांनी व्यक्त करत, कौटुंबिक पालकत्वाची परंपरा करू खंडित आणि गेवराईतून आमदार करून बदामराव पंडित अशी घोषणा करताच कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्यात आली. कोरोनाच्या कालावधीत कुटुंबकर्ता म्हणून भूमिका पार पाडून राज्य वाचवले. शेतीमालाला योग्य भाव दिला. परंतु त्यांच्यासोबत गद्दारी करून भाजपने त्यांना मुख्यमंत्रीपदावरून बाजूला केले. यामुळे सामान्य जनता संतप्त असून उद्धव साहेबांना पुन्हा सत्तेत आणण्यासाठी शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहत आहेत. गेल्या ३० वर्षापासून मी तुमची रात्रंदिवस सेवा केली आहे. कामे केली आहेत आणि यापुढेही करणार आहे. शेतकरी आणि सामान्य माणसांसाठी मी अनेक आंदोलने केली आहेत. आज मला तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. या विधानसभा निवडणुकीत तुमचे दोन महिने माझ्यासाठी, पक्षासाठी आणि उद्धव साहेबांसाठी द्या पुढचे पाच वर्ष दिवस रात्र मी तुमच्यासाठी सज्ज असेल असे आवाहनही बदामराव पंडित यांनी केले.

यावेळी पारंपारिक वेशभूषेतील बंजारा समाजाच्या महिलांनी सुषमाताई अंधारे यांचा सत्कार केला.बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, सहसंपर्कप्रमुख लक्ष्मणराव सानप, महिला संघटिका संपादाताई गडकरी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर तालुकाप्रमुख गोरख सिंगम यांनीही आपल्या अभ्यासपूर्ण आणि जोशपूर्ण भाषणात बदामराव पंडित यांना आमदार करूनच मातोश्रीवर गुलाल उधळण्याचा संकल्प बोलून दाखवला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विजयाच्या घोषणा देऊन, कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला, एकच पंडित बदाम पंडित म्हणत प्रचंड घोषणाबाजी करत जल्लोष केला. या मेळाव्यास माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी सभापती तुकाराम हराळे, युवराज डोंगरे, महादेव औटी, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे युवा सेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, माजी सभापती विठ्ठल जाधव, युवासेना उपजिल्हाप्रमुख सय्यद सिराज, किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, युवा सेना शहर प्रमुख शेख शेहदाद, सुभाष शिंदे, बदाम पोळ, शेख फत्ते मामू, कल्याण राऊत, जगदीश मस्के, तय्यब पठाण, भाऊसाहेब शिंदे, हरिभाऊ गलधर, विलास शिंदे, सोपानराव जाधव, संतराम काळे, भारत मडके, कैलास राठोड, अविनाश राठोड, आबा उबाळे,उषाताई कानडे, आदींसह हजारो महिला व पुरुष शिवसैनिक उपस्थित होते.

# शिंदेवाडी जि प शालेय शिक्षण समिती अध्यक्षपदी आकाश मोटे यांची निवड

गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील शिंदेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी आकाश बाबासाहेब मोठे यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे पुष्पहार घालून सत्कार केला.

तालुक्यातील शिंदेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय शिक्षण समितीची निवड नुकतीच संपन्न झाली या शालेय समितीच्या अध्यक्षपदी शिवसैनिक असलेले आकाश बाबासाहेब मोटे यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते



यशराज पंडित यांनी आपल्या निवासस्थानी आकाश मोटे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, बाबा मोटे, अण्णा मोटे, अशोक मोटे, हरिभाऊ मोटे, वैजनाथ भावले आदींसह शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# टाकरवन येथे गायरान जमीनिवर अवैध मुरुम तस्करांचा सुळसुळाट

टाकरवन (प्रतिनिधि )

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे मोठ्या प्रमाणात गायरान क्षेत्र असून. या क्षेत्राचे स्वरुप डोंगर, माळरान आहे. सर्व मागासवर्गीय भूमिहीन कष्टकरी गायरान धारक शिवार गट नं २७४ मधे १९८० पासून येथील मागासवर्गीय गायरान जमिनीची मशागत करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहे .दुसरे कोणतेही उत्पन्नाचे व उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे तेथील गायरान जमिनीवर त्यांचे पीक उभारलेले असून गेल्या आठ दिवसापूर्वी त्या गायरान जमिनीमध्ये अनाधिकृतरित्या मुरमाचे उत्खनन व गौन खनिजाची चोरी मोठ्या प्रमाणात झाली व सर्वस्व सुरू आहे.सदरील बाबीची कल्पना टाकरवन सज्जा तलाठी साहेब यांना दिलीअसून त्यांनी




कोणतीही याबाबतची कारवाई केली नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी माजलगाव तहसीलदार साहेबांना फोनव्दारे कळविन्यत् आले परंतु त्यांच्याकडूनही कोणती कार्यवाही नझाल्यामुळे गायरन धारकांने जिल्हाधिकारी साहेबांना फोनव्दारे माहिती दिली जिल्हाधिकारी साहेबांनी त्वरील आदेश देऊन संबंधीत मुरुम उत्खननास आळा घातला

२६ सप्टेबर रोजी सर्व गायरन धारकानी संबंधित तहसीलदार साहेब यांना आज्ञात व्यक्तीच्या विरोधात अर्जाद्वारे तक्रार करण्यात आली .मुरुमाच्या उत्खननामुळे गायरान जमीनीमध्ये मोठमोठे खडे झाल्यामुळे सदर जमीनीत जान्या येण्या साठी रस्ता नसून त्यावेळेस संबंधीत तलाठी साहेबांनी जायमोक्यावर येऊन स्थळपंचानामा केला असून संबंधीत गायरान जमीनीवरील कास्तकऱ्यांनी सदर पंचनाम्यावर सह्या केलेल्या असून मुरुम उत्खनन करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुध्द कडक कार्यवाही करावी अशी माघणी गायरान धारकांनी केली

गायरान धारक

आदरनिय जिल्हाधिकारी साहेबांना आमची विनंती आहे की, गायरान धारकाचा पिक पंचनामा करुन एक ई ला नोंद घ्यावी आणि गायरान जमीन आमच्या नावे करुन द्यावी ही नम्र विनंती.

# गायरान धारकांसह व विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर शैलेंद्र पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली धडकला मोर्चा

## सिरसाळा ते बीड पायी लाँग मोर्चा

बीड ।प्रतिनिधी

गायरान धारकांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार ठोस भूमिका घेत नाही. शासनाने गायरान धारकांचे प्रश्न मार्गी लावावेत, या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचे जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे नेतृत्वाखाली बुधवारी सिरसाळ्यातून पायी मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चामध्ये शेकडो गायरान धारकांचा समावेश होता.

गायरान धारकांच्या नावे व भोगवटा धारक यांच्या नावे पीटीआर देण्यात यावा, रमाई व पंतप्रधान घरकुलाच्या लाभार्थ्यांना ५ लाख रुपये देण्यात यावे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे




यांना भारतरत्न देण्यात यावा, सर्व मागासवर्गीय महामंडळांचे कर्ज माफ करण्यात यावे, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, यासह इतर मागण्यांसाठी सिरसाळ्यातून २५ सप्टेंबर रोजी पायी मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. सदरील मोर्चा हा शैलेश पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला होता.

या मोर्चा विविध संघटनेने पाठिंबा दर्शवला गौतम दादा भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे, करचुडीचे जयसिंग वीर व गावकरी,ऑल इंडिया पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, बसपाचे प्रशांत वासनिक व आंबेडकर संघटनेचा पाठिंबा लाँग मोर्चा दिला या मोर्चास उपस्थित कविता घोरपडे महिला मराठवाडा कार्य अध्यक्ष पंडित झिंजुर्डे, सचिव सीताताई भोसले, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी व जिल्ह्यातील प्रमुख तालुका अध्यक्ष व गायरान धारक उपस्थित होते.

# श्री आंबाचोंडी रस्त्यावर विजेची व्यवस्था करून महीला भावीकांचे सुरक्षीतता साठी दक्षता घ्या

पर्यावरण वाचवा ग्रुपचे निवेदन

किल्लेधारूर / प्रतिनिधी

धारूर शहराचे आराध्य दैवत श्री क्षेत्र आंबाचोंडी देवीचा नवरात्र मोहत्सव सुरू होतय या काळात नगरपरीषदेने भावीकाना मुलभूत सुविधा देऊन पोलिसांनी महीला भाविकांचे सुरक्षिततेची काळजी घ्यावी आशी मागणी किल्ले धारूर पर्यावरण प्रेमी ग्रुप चे वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

किल्ले धारूर पर्यावरण वाचवा ग्रुपच्या वतीने महावितरण, नगरपरिषद व पोलीस स्टेशनला यांना निवेदना द्वारे श्री क्षेत्र आंबाचोंडी देवी चा नवरात्र मोहत्सवस सुरू होत असून भाविकांची नवरात्रात मोठ्या संख्येने गर्दी असते. भावीकांची



गैरसोय होऊ नये या साठी आंबाचोंडी परिसरातील रोडवरील विदयुत खांब्यां वर लाईटची सोय करून आब़ाचोंडी परीसरात स्वच्छता करावी व नगरपरीषदेने येथे लक्ष द्यावे पोलीस यंत्रणेणे महीला भावीकांची सुरक्षीततेची उपाययोजना करावी. महा वितरणे विद्युत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी उपाययोजना करावी व भक्ताची गैरसोय होणार नाही याच़ी काळजी घ्यावी आशी मागणी किल्लेधारूर पर्यावरण वाचवा ग्रुप ने निवेदना द्वारे केली असून यावेळी सचिन भगाडे, गोकुळ गायकवाड, गणेश कापसे, विजय मिसाळ, वैभव खाडे हे सर्व उपस्थित होते.

# नाळवंडीतील आरोग्य शिबिरात १ हजार २६५ रुग्णांची तपासणी

## डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागरांचा स्तुत्य उपक्रम

**बीड (प्रतिनिधी)**

**तालुक्यातील नाळवंडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.२७) घेण्यात आले. शिबिरात १ हजार २६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून गटनिहाय हा उपक्रम राबविण्यात येत आहे.**

नाळवंडी येथील प्राथमिक आश्रम शाळेत आरोग्य शिबिराचे उद्घाटन केले. दिवसभरात १ हजार २६५



रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. ६८२ जणांना मोफत चष्मे वाटप केले. १३२ जणांची रक्त तपासणी, १६२ जणांची ईसीजी केली. तर १७ जणांनी रक्तदान केले. उद्घाटन प्रसंगी डॉ.क्षीरसागर दाम्पत्यासह जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेससचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, माजी पं.स.सदस्य अच्युतराव शेळके, सुधाकर काकडे, अरुण लांडे, दत्ताप्रसाद सानप, मंगलताई म्हेत्रे, संगीताताई वाघमारे, अशोक वैद्य, बबन वाघमारे, मिलींद ठोकळ, संजय काळे, शेख बिलाल, रामहरी कुटे, सुमंत राऊत, शाम राऊत यांच्यासह पंचक्रोशीतील रुग्ण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धुनकवाड ग्रामपंचायतने वस्ती आस्तित्वात नसताना देखिल हायमास्टच्या नावाखाली तिस लाख रुपयांचे बील अदा करु नका

## पाराराम यादव यांची जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या कडे तक्रार

**धारूर ।प्रतिनिधी**

**ग्रामपंचायत गावठाणे हद्दीमध्ये वस्ती दाखवताच येत नाही तरी पण धुनकवाड नं - १ वनं २ या गावामध्ये ग्रामसेवकाला हाताशी धरून सरपंचांनी धनगरवस्ती, वंजारी वस्ती व इतर एक वस्ती गावामध्येच दाखवून निकृष्ठ दर्जाचे हायमास्ट दिवे बसविले व या तीन वस्त्यांचे मिळुन तिस लाख रुपयांचे ईस्टीमेट तयार केले. परंतु वस्ती नसतानाच गावामध्येच खालच्या दर्जाचे म्हणजे निकृष्ठ हायमास्ट बसवले याची तक्रार या गावचे पाराराम गोविंद यादव यांनी रितसर तक्रार गटविकास अधिकारी धारूर व जिल्हा , परिषद बीड चे मुख्य कार्यकारी**

अधिकारी यांच्याकडे केलेली असुन सदरिल गावामध्ये येऊन स्पॉट पंचनामा करावा व धुनकवाड गावचे ग्रामसेवक यांची जो पर्यंत कामाची चौकशी होत नाही तो पर्यंत त्यांची बदली करण्यात येऊ नये अशी तक्रार देखिल



त्यांनी केलेली आहे. तसेच ज्या ठिकाणी हायमास्ट बसविण्याचे ठिकाण आहे त्या ठिकाणी न बसविता चुकिच्या ठिकाणी बसवण्यात आले आहेत. ज्या प्रकारे हायमास्टचे अंदाजपत्रक बनवले त्यानुसार काम देखिल झालेले नाही. तरी याची वरिष्ठ पातळीवर चौकशी होऊन दोषीवर कडक कार्यवाही करावी व ३० लाख रुपयांचे बील चौकशी होई पर्यंत देण्यात येऊ नये तसे काही झाले तर चुकीच्या ठिकाणी बसवलेल्या हायमास्ट दिव्याच्या पोलवर चढुन आंदोलन करू अशी इशारा श्री पाराराम गोविंद यादव यांनी दिला आहे.

## ●आपसातील कलगीतुरा बंद करा●

# ४० वर्षाच्या विकासाचा अहवाल जनतेपुढे मांडा -नितीन जायभाये

### बीड शहर बचाव मंचाने दिले महाभ्रष्ट सत्ताधाऱ्यांना आव्हान

बीड ।प्रतिनिधी

एकीकडे बीड शहरातील जनतेवर संकटांचे डोंगर कोसळत असताना. या सत्ताधाऱ्यांना कलगीतुरा खेळण्याचे नाटक सुचतेच कसे? पावसाचे आणि गटारांचे पाणी बिडकरांच्या घरात आणि दुकानांमध्ये घुसवून* बीडच्या जनतेला जिवंतपणे नरकात पाठवणाऱ्या या नितीभ्रष्ट झालेल्या महाभ्रष्ट नरकासुरांना गेल्या ४० वर्षात बीडचा काय विकास केला याचा हिशोब जनतेपुढे मांडवाच लागेल. या बीड शहरात बाजारपेठेंच्या मुख्य रस्त्यावर कुठेही अद्यावत महिला स्वच्छतागृहे हे महाभृष्ट सत्ताधारी आजपर्यंत बांधू शकले नाहीत हाच काय यांचा विकास ? बीड शहरातील आया-बहिणींच्या मायमाऊलींच्या बद्दल असलेली तळमळ ?

हेच का यांचे पर्व ? कधी यांनी बीडमध्ये उद्योग व्यवसाय वाढण्यासाठी व औद्योगिक क्षेत्र आणण्यासाठी प्रयत्न केले ? कायम फक्त आपलीच घरं भरली. बीड करांना इतर शहरांमध्ये गेल्यानंतर तेथील नगरपालिका मूलभूत सोयी सुविधा किती चांगल्या पद्धतीने पुरवितात हे पाहून अक्षरशः लाज वाटते शरमेने मान खाली जाते. तिथे भेटलेली लोकं म्हणतात अहो तुम्ही बीडचे का आजही खूपच मागासलेला असलेला भाग आहे तुमचा... तेव्हा खरंच आपल्या सर्व विकास पुरुषांबद्दल फार अभिमान वाटतो... कधी थांबणार हे सगळं..? कलगीतुरे थांबवा आणि विकासाचा अहवाल जनतेपुढे सादर करा ही मी जिम्मेदारी पूर्वक बीड शहरातील जनतेच्या वतीने व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने मागणी करत आहे.



माजलगाव नगरीचे नगराध्यक्ष मासहालभैय्याचाउस यांची महाराष्ट्रा प्रदेश सरचिटणीस (राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचंद्र पवार ) पदी निवड झाल्या बद्दल व तीरंगा रैली साठी माजलगाव तालुक्या साठी गाड्या ची सोई केल्या बद्दल माजलगाव च्या युवकांन तर्फे सत्कार करण्यात आला... .



आज सायंकाळी बीड शहरातील पेठ बीड भागात विनोद दादा हातागळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संपर्क कार्यालय केले असून,याचे उद्घाटन केले.तसेच श्री.अविनाश हातागळे यांनी नुकतेच कुस्ती स्पर्धेत विजय मिळवला त्यांचा देखील समारंभ येथे पार पडला.यासमयी उपस्थित मा सारिखा ताई क्षिरसागर नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी प्रीती माऊली लातूरकर,शेख खदिरभाई,शुभम कातांगळे,माऊली पानसंबळ,माजेद कुरेशी,रुस्तुम बेदरे,राम वाघमारे,विशाल सोलंके,शेषनारायण खरमाटे,आसाराम माने,विकास यादव,नंदन पवार,साजेद जहागीरदार,शुभम कुलथे,विद्याभूषण बेदरकर,विशाल मोरे,कैलास गायकवाड,विशाल वाघमारे,शुभम वीर,आयोजक हातागळे परिवार व नागरिकांची उपस्थिती होती.

# बाजीराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'एकनाथ आरोग्य रथ' बीडकरांच्या सेवेत रुजु !

बीड ।प्रतिनिधी

आरोग्य क्षेत्रात सतत कार्यरत असलेले आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी आपल्या नव्या संकल्पनेतून एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. नुकतेच मुख्यमंत्री मा. एकनाथ जी शिंदे यांच्या हस्ते 'एकनाथ आरोग्य रथ' या फिरत्या दवाखान्याचे उद्घाटन करण्यात आले. हा आरोग्य रथ बीड मधील जनतेच्या सेवेत तत्पर झालेला आहे.वांगी गावापासून या उपक्रमाची सुरुवात झालेली आहे. या फिरत्या दवाखान्यात १०० हून अधिक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध असून, लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी हे आरोग्य सेवा केंद्र एक वरदान ठरले आहे. विशेषतः, वयोवृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी, ज्यांना




हॉस्पिटलमध्ये जाणे कठीण होते, त्यांच्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला आहे. त्यांच्या दारापर्यंत येणारी आरोग्यसेवा हे या रथाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.बाजीराव चव्हाण यांनी यापूर्वीही विविध माध्यमांतून लोकांच्या आरोग्य समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. या नव्या उपक्रमाच्या माध्यमातून ते ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य सेवांसाठी हा उपक्रम एक आदर्श उदाहरण ठरला असून, येत्या काळात याचा विस्तार अधिकाधिक गावांमध्ये करण्यात येईल, अशी अपेक्षा आहे.

# मनुर रोड महेबुब नगरमध्ये नळाची पाइपलाइन टाकणे वाल टांकणे तसेच रस्त्यावरचे खांब काढुण एक साइट टांकणे नंसता धरणे आंदोलन

माजलगांव ।प्रतिनिधी

माजलगांव शहरात महेबूबनगर मनुर रोड मध्ये काही दिवसा पुर्वी नगर परिषद मार्फत पाइपलाइन तात्पुर्ति करण्यात आली होती माजलगांव क्षेत्रातिल महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियांतर्गत रस्ते काम चालू असुन दोनी साईट नाळी काम चालू असुन सदर झालेली तात्पुर्ति पाइपलाइन ही कामा दरम्यान सदर गुत्तेदार यांनी फोडली आहे रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर पाण्यांची पाईप लाईन व्यवस्थित व पुर्ण होणार नाही आणि जर कराची असेल ते रस्ता फोडून करावे लागेल त्यामुळे सदर पाईपलाइन ही रस्ता तयार होण्यापुर्वीच व्यवस्थित रित्या करूण देण्यात यांवी मुख्याधिकारी



साहेबानी मनुर रोड महेबुब नगर येथील काम थांबुन जागो जागी वाल टाकावी व पुर्ण गल्ली बोळीत पाईप लाईन करूण देण्यात यावी तसेच चॉदणी चोंक पासुन ते नवीन कब्रस्तान पर्यंत रोडचे खांब रोडाचे मध्ये भांगी आली आहे ती काढून एक साइट करावी जींवित हाणी होणार नाही यांची दक्षता घ्यावि महेबूबनगरच्या ताहाणलेल्या नागरिकाना पिण्याचे पाण्यांची सुविधा करूण देण्यात यांवी नंसता भारतीय ऑल मिडिया सुरक्षा फोरम ऑफ इंडिया तर्फे दिं १०/१०/२०२४ रोजी नगर परिषद समोर नागरिक सोबत घेऊण धरणे आंदोलन करण्यात येईल असे पत्रकार नाजेर भाई कुरेशी यांनी कळविले आहे,

मनुर रोड महेबुब नगरमध्ये नळाची पाइपलाइन टाकणे वाल टांकणे तसेच रस्त्यावरचे खांब काढुण एक साइट टांकणे नंसता धरणे आंदोलन

माजलगांव ।प्रतिनिधी

माजलगांव शहरात महेबूबनगर मनुर रोड मध्ये काही दिवसा पुर्वी नगर परिषद मार्फत पाइपलाइन तात्पुर्ति करण्यात आली होती माजलगांव क्षेत्रातिल महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियांतर्गत रस्ते काम चालू असुन दोनी साईट नाळी काम चालू असुन सदर झालेली तात्पुर्ति पाइपलाइन ही कामा दरम्यान सदर गुत्तेदार यांनी फोडली आहे रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर पाण्यांची पाईप लाईन व्यवस्थित व पुर्ण होणार नाही आणि जर कराची असेल ते रस्ता फोडून करावे लागेल त्यामुळे सदर पाईपलाइन ही रस्ता तयार होण्यापुर्वीच व्यवस्थित रित्या करूण देण्यात यांवी



मुख्याधिकारी साहेबानी मनुर रोड महेबुब नगर येथील काम थांबुन जागो जागी वाल टाकावी व पुर्ण गल्ली बोळीत पाईप लाईन करूण देण्यात यावी तसेच चॉदणी चोंक पासुन ते नवीन कब्रस्तान पर्यंत रोडचे खांब रोडाचे मध्ये भांगी आली आहे ती काढून एक साइट करावी जींवित हाणी होणार नाही यांची दक्षता घ्यावि महेबूबनगरच्या ताहाणलेल्या नागरिकाना पिण्याचे पाण्यांची सुविधा करूण देण्यात यांवी नंसता भारतीय ऑल मिडिया सुरक्षा फोरम ऑफ इंडिया तर्फे दिं १०/१०/२०२४ रोजी नगर परिषद समोर नागरिक सोबत घेऊण धरणे आंदोलन करण्यात येईल असे पत्रकार नाजेर भाई कुरेशी यांनी कळविले आहे,

# भिमशक्तीच्या बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी सुनिल धिमधिमे यांची नियुक्ती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी धर्मनिरपेक्षपणे लढणारी संघटना म्हणून भिमशक्तीची सर्वदूर ओळख आहे. भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खासदार तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देवून भिमशक्तीच्या बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी सुनिल धिमधिमे यांची नियुक्ती केली आहे.येथील आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू कार्यकर्ते सुनिल धिमधिमे (संपादक, साप्ताहिक महाराष्ट्राची शान) हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. चळवळी मध्ये त्यांचे चांगले योगदान आहे. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून, गरजूंना मदत करून त्यांनी प्रबोधनाचा वारसा जोपासला आहे. बांधिलकी जोपासत गोरगरीब, गरजू लोकांना दवाखाना असो, तहसील असो किंवा पोलिस स्टेशन येथे त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी धिमधिमे हे कायमच जनसेवा करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन भिमशक्तीचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात, मराठवाडा उपाध्यक्ष हरिश्चंद्र विद्यागर, बीड जिल्हाध्यक्ष डॉ.अमरेंद्र विद्यासागर, कार्याध्यक्ष भिमराव सरवदे यांच्या हस्ते सुनिल धिमधिमे यांना रविवार, दिनांक २२ सप्टेंबर रोजी नियुक्तीपत्र देवून त्यांची भिमशक्तीच्या बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीनंतर नुतन जिल्हा प्रसिध्दीप्रमुख धिमधिमे यांनी कोळकानडी येथे 'संविधान' या त्यांच्या निवासस्थानी भिमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात, कार्याध्यक्ष भिमराव सरवदे यांचा हृद्य सत्कार केला.



### भिमशक्तीचा विचार सर्वदूर पोहोंचवणार :

खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी माझी नियुक्ती करून मोठी जबाबदारी सोपविली आहे. याचा मी स्विकार केला आहे. नियुक्ती करणाऱ्यांच्या विश्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नाही. पुढील काळात संघटनेचे सर्व मार्गदर्शक, ज्येष्ठ, आजी - माजी पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन भिमशक्तीचा विचार सर्वदूर पोहोंचवणार आहे.

- सुनिल धिमधिमे (भिमशक्ती, प्रसिध्दीप्रमुख, बीड.)

यावेळी बीड जिल्हाध्यक्ष डॉ.अमरेंद्र विद्यासागर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भिमशक्तीचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव बनसोडे (धाराशिव), युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शंभुराजे देशमुख, भिमशक्तीचे मराठवाडा उपाध्यक्ष हरिश्चंद्र विद्यागर, भिमशक्तीचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष राजाभाऊ मंजुळे हे उपस्थित होते. तर भिमशक्तीच्या बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी सुनिल धिमधिमे यांची निवड करण्यात आल्याबद्दल कुणाल इंगळे, ढवळे साहेब (लातूर), मार्गदर्शक बी.एम.बनसोडे, तात्याराव वाघमारे (धाराशिव), अल्लाउद्दीन शेख (केज), भिमशक्तीचे केज शहराध्यक्ष शिवमूर्ती हजारे, धीमंत राष्ट्रपाल, सरपंच ज्योतिर्लिंग नाना गुजर, उद्योजक रघुवीर देशमुख, भारत गाढवे, हरिश्चंद्र ढगे, अक्षय सुरवसे, आकाश मुंडे (परळी वैजनाथ), महेंद्र धिमधिमे (उपसंपादक, साप्ताहिक महाराष्ट्राची शान), कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे परळी तालुकाध्यक्ष दिलीप भालेराव, वैजेनाथ काळे, सुमित आवाडे, सामाजिक कार्यकर्ते संजय साळवे यांच्यासह मित्र, परिवार व नातेवाईक यांच्यासह धिमधिमे यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातून स्वागत होत आहे.



## इंटरनॅशनल कराटे स्पर्धेत डहाणूतील विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

पालघर: प्रतिनिधी

मुंबईच्या अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे रविवार, २२ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित इंटरनॅशनल कराटे स्पर्धेत डहाणूतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध पदके जिंकली आहेत. आपल्या कौशल्याच्या जोरावर त्यांनी विविध गटांमध्ये भाग घेत पदकांची लयलूट केली आहे.

या विविध गटात खेळल्या गेलेल्या स्पर्धेमध्ये अक्षिता रमेश ठाकरे हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने दोन सुवर्ण पदक पटकावून आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. श्रेयस रमेश ठाकरेने रजत पदकाची कमाई करून स्पर्धेत आपला ठसा उमटवला. मेहर्ष भरत पाटील याने आपल्या चपळाईने सुवर्ण पदक प्राप्त केले आणि स्पर्धेत आपले प्रभुत्व सिद्ध केले. दक्ष रवी पटनाईक दोन सुवर्ण पदके मिळवून आपले स्थान घट्ट केले आणि प्रेक्षकांच्या कौतुकास पात्र ठरला.दिव्यता रवी पटनाईक सुवर्ण आणि कास्य पदक मिळवून तिच्या कौशल्यपूर्ण खेळाची छाप सोडली. कुशल कनया ठाकूरने कास्य पदक जिंकून आपल्या मेहनतीचा पुरावा दिला तर ह्रिधम नीलमकुमार कडूने रजत पदक प्राप्त करून स्पर्धेत उल्लेखनीय योगदान दिले.

या विद्यार्थ्यांना डहाणूतील आगर नानी माता मंदिर आणि केवडा देवी मंदिर परिसरात नियमित प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षक सेंसाई कैलाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कठोर परिश्रम करत ही यशस्वी कामगिरी साधली.'ट्रॅडिशनल अँड स्पोर्ट्स शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया' या संघटनेच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना इंटरनॅशनल स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT